## प्रकरण पहिले

# भौगोलिक परिस्थिती, शिवपूर्वकालीन राजकीय इतिहास आणि साधनांची व्याप्ती

### १-i) भौगोलिक परिस्थिती -

इतिहास हे भूगोलाच्या वृक्षावरील फळ होय, असे म्हटले जाते. भूगोलाशिवाय इतिहास म्हणजे परिकथा होय. तसेच इतिहासाशिवाय भूगोल म्हणजे नैसर्गिक पट्ट्यांचा अभ्यास होय. भौगोलिक घटक हे इतिहासाचा प्रवास, त्याची दिशा, त्याचा वेग आदी निश्चित करतात. भूगोल इतिहासाला वळण लावू शकतो. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये भूगोलाचे म्हणजेच भौगोलिक घटकांचे अनन्य साधारण महत्व असते, हे भारताच्या इतिहासातून स्पष्ट होणारे सत्य आहे.[१]

मराठ्यांच्या सत्तेचा ज्या महाराष्ट्रात उदय आणि विकास झाला त्यालाही महाराष्ट्राचा भूगोल काहीसा उपकारक ठरला यात वाद होण्याचे कारण नाही. न्या.म.गो.रानडे यांनी मराठ्यांच्या सत्तेच्या उदयाची कारणमीमांसा करताना असे म्हटले आहे की, ''मराठ्यांच्या राजकीय उलाढालीत या भौगोलिक परिस्थितीने फारच महत्वाची भूमिका बजाविली आहे.''[२] इतिहास म्हणजे एका अर्थाने भौगोलिक परिस्थिती, स्वाभाविक रचना, राज्यशास्त्रातील प्रमुख सिध्दांत किंवा राजनितीतील प्रमुख कल्पना यांचा एकमेकांवर परिणाम होवून घडलेल्या घटनात होत. एखाद्या विशिष्ट देशाच्या भौगोलिक स्थितीचा त्या देशाच्या राजकीय जीवनावर परिणाम होतो याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मराठ्यांची सत्ता. नैसर्गिक स्थिती व हवामान यांचा राजकीय जीवनावर परिणाम होतो. विजय किंवा पराभव बहुतांशी भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात.

विसाव्या शतकातील अत्याधुनिक अशी अण्वस्त्रे, लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने, युध्दनौका, प्रशिक्षित वायुसेना यामुळे कदाचित भौगोलिक परिस्थितीचे महत्व कमी होत असेल. तथापी १७ व्या, १८ व्या शतकातील हिंदुस्थानचा इतिहास घडविण्यात भौगोलिक परिस्थितीचा वाटा मोठा होता, हे नाकबूल करता येणार नाही.

छ.शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा जो उपयोग केला तो महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेमुळेच. शिवाजीनंतर संभाजी, राजाराम, ताराबाई व त्यांचे सरदार यांनी औरंगेजेबासारख्या बलाढ्य शत्रूस जेरीस आणले, ते येथील भौगोलिक परिस्थितीमुळेच.

पेशवे काळात बाजीराव पेशव्याने निजामाचा पालखेड व भोपाळ येथे जो पराभव केला त्या पाठीमागे भौगोलिक परिस्थितीच कारणीभूत होती. बाजीरावास राजनीतीप्रमाणे भूगोलाचेही ज्ञान होते. म्हणूनच त्याने निजामास अडचणीत गाठून पराभूत केले.

मराठ्यांची सत्ता ज्या द.भारतात उदयास आली त्या दक्षिणेची भौगोलिक परिस्थिती प्रथम पाहणे उचित होईल. हिंदुस्थानच्या मध्यभागी असणाऱ्या पूर्व-पश्चिम विंध्य पर्वताच्या रांगेमुळे उत्तर भारत व दक्षिण भारत अशी हिंदुस्थानची दोन भागात विभागणी होते. ऐतिहासिक व राजकीय दृष्टीने पुढील विभाग पडतात.

दख्खन हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ दक्षिण असा होतो. नर्मदेच्या दक्षिणेकडील परंतु कृष्णेपर्यंतच्या प्रदेशाला दख्खन असे भूगोल (हिंदू) तज्ञांनी नांव दिले. सन १६९० मध्ये औरंगजेबाने दक्षिण जिंकली तेव्हा दख्खनचे सहा सुभे होते. ते म्हणजे अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा, बिदर, खानदेश, गौंडवन.

वरील प्रदेशात हिंदू ही प्रबळ जमात होती आणि मराठा सत्तेच्या वर्चस्वाखाली हा प्रदेश मोडत होता.

**दक्षिण पठार -**

या पठाराचा गाभा कठीण खडकांचा बनलेला असून हे पठार प.कडून पूर्वेकडे उत्तरेत होत गेले आहे. या पठाराचा पश्चिम कडा म्हणजे सह्य पर्वत होय. यामुळे भारताच्या प.भागाचे संरक्षण झाले आहे. मराठ्यांनी याच सह्य पर्वतातील भागातील अनेक किल्ले जिंकून सत्तेचा विस्तार केला. या पठाराची समुद्रसपाटीवरील उंची ३०० ते ९०० मीटर आहे. या पठाराच्या उत्तरेस सातपुडा पर्वत असून त्याच्या उत्तरेस नर्मदा व दक्षिणेस तापी या दोन नद्या असून पुर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. याची पठारी प्रदेशात गोदावरी, कृष्णा, महानदी इत्यादी मोठ्या पूर्ववाहिनी नद्या व तुंगभद्रा व कावेरी या उपनद्या आहेत.

दक्षिणेकडील नद्या पावसाळ्याच्या काळात वाहतुकीसाठी उपयुक्त ठरतात. तर उन्हाळ्याच्या काळात समुद्रा लगतचा भाग सोडला तर कोरड्या पडतात. त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धान्याची वाहतूक करण्यासाठी बैलगाड्यांचा वापर करावा लागे. हा व्यापार व्यवसाय वंजारी लोक करत. ते मूळ राजपूतान्यातील होय.[३]

सतराव्या शतकात या पठाराच्या प.घाटात व मैदानी प्रदेशात मराठ्यांची सत्ता उदयास आली आणि तीच पुढे उत्तर-दक्षिण अशी विस्तारत गेली.

**पूर्व-पश्चिम किनारपट्टीचे प्रदेश -**

दक्षिण हिंदूस्थानच्या पूर्व किनारपट्टीस कोरोमंडलचा किनारा असे म्हणतात. तर प.किनारपट्टीच्या उत्तर भागाला कोकणची किनारपट्टी व दक्षिण भागास मलबारची किनारपट्टी असे म्हणतात. पश्चिम किनारपट्टीस समारंत अशा अनेक पर्वतांच्या रांगा असल्यामुळे हा प्रदेश दुर्गम झाला आहे. या उलट अनेक नद्या पूर्वेकडच्या बंगालच्या उपसागरास मिळत असल्याने नदीमुखातून पूर्वेकडील किनारपट्टीच्या प्रदेशात प्रवेश करणे सुलभ झाले. या दोन किनारपट्टीच्या डच, फ्रेंच, पोर्तुगीज व इंग्रजांनी प्रथम व्यापारी संबंध जोडले व कालांतराने भारतावर इंग्रजांचे राज्य निर्माण झाले.[४]

**मध्यवर्ती मैदानी प्रदेश -**

उत्तरेकडील पर्वतमय भाग व दक्षिणेकडील पठारी प्रदेश ह्यामधील हा विस्तिर्ण भाग. पश्चिमेकडील राजपूतान्याच्या वाळवंटापासून पूर्वेस गंगेच्या त्रिभूज प्रदेशापर्यंत पसरलेला आहे. गंगा, यमुना, सतलज व ब्रह्मपुत्रा या रुंद पात्रांच्या नद्या वाहत असून या नद्यांच्या खोऱ्यातील सुपीक प्रदेशातच आर्य संस्कृती उदयास आली. पुढे सुलतानशाही आणि मोगल बादशाही यांचाही येथेच उदयास्त झाला.

**महाराष्ट्र –**

सर जदुनाथ सरकार महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीविषयी म्हणतात, ''भौगोलिक परिस्थितीमुळे मराठ्यांच्यात स्वावलंबी वृत्ती, शौर्य, चिकाटी, काटकपणा इत्यादी गुणांचा प्रादुर्भाव झाला.''[५] सरकारांचे वरील मतमान्य करण्यास हरकत असण्याचे कारण नाही. मराठ्यांचा स्वभाव काटक बनण्यास महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती कारणीभूत ठरली असे नि:संदिग्धपणे न्या.रानडे यांनी सरकारां अगोदर म्हटले होते. ते म्हणतात, ''देशाचे स्वरुप असे असल्यामुळे लोक सशक्त, काटक व काटेकोर आहेत.''[६]

वरील दोन विद्वानांची मते पाहिल्यानंतर महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचे थोडक्यात विवेचन करणे क्रमप्राप्त आहे.

कै.राम गणेश गडकरी यांनी आपल्या महाराष्ट्र गीतात महाराष्ट्राचे वर्णन करताना म्हटले आहे की, ''राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा। ............... ठायी ठायी पांडव लेणी सह्याद्री पोटी। किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्री पाढा।[७] इतिहास प्रेमी गो.नि.दांडेकर म्हणतात, ''सह्याद्रीने महाराष्ट्राला जगावे कसे ते शिकवले आणि मरावे कसे तेही शिकवले. एकदा बघावे त्याच्या उत्तुंग शिखराकडे, अशी शिखरे की, जी एकेकटीच आकाशाशी झटे घेत आहे. वारे वाहतात, वादळे कोसळतात, धावधावून मेघांचे समुदाय चालून येतात, वीजा कडकडतात, आकाशातून निखळून पाताळवेरी शिरतात. तरी हे कडे अभंग आहेत. या कड्यांनीच महाराष्ट्रास स्वातंत्र्याचे पाठ दिलेत.''[८] महाराष्ट्र हा डोंगरदऱ्यांचा, पठारांचा, छोट्या छोट्या नद्यांचा प्रदेश आहे. सह्याद्रीच्या असंख्य रांगांनी व त्यावरील अभेद्य किल्ले यांनी, घनदाट अरण्ये यांनी, नद्यांनी मराठ्यांच्या स्वराज्य निर्मितीत त्यांना अमोल सहाय्य केले.

महाराष्ट्राचा आकार त्रिकोणाकृती आहे. उत्तरेस सातपुडा, दक्षिणेस पंचगंगा, तर पश्चिमेस अरबी समुद्र अशा महाराष्ट्राच्या सर्वसाधारण सीमा आहेत. सह्याद्रीच्या उत्तर-दक्षिण विस्तारामुळेच महाराष्ट्राचे कोकण व देश असे दोन विभाग पडले आहेत. सह्याद्री समुद्र किनाऱ्यापासून २५/३० मैल अंतराने पसरलेला आहे. त्याच्या प्रचंड रांगा तीन-चार हजार फूट उंचीच्या असून महाराष्ट्राचा २५/३० मैल रुंदीचा पट्टा त्याने अतीशय दुर्गम व निबीड अरण्याचा करुन सोडला आहे. सह्याद्री व अरबी समुद्र यांच्या दरम्यान असलेला कोकण भाग हा असंख्य खाड्या व नद्या यांनी उंच सखल बनलेला आहे. देशावरुन कोकणात जाण्यासाठी त्यावेळेस घाट होतें. परंतु ते इतके धोकादायक व अडचणीचे होते की, कोकणात उतरणारे शत्रुंचे सैन्य परत जाण्याची शाश्वती नसे. सह्याद्रीच्या रांगांवर महाराष्ट्राचे किल्ले उभे आहेत. पर्वतांनी दुर्गम बनलेला प्रदेश, सभोवतालच्या दऱ्यातील दाट झाडी, उंच उंच कडे यामुळे हे किल्ले म्हणजे मराठ्यांची आश्रयस्थाने बनली होती. असे पुष्कळसे किल्ले कोकण व देश यांच्या मध्यावर बांधले गेल्यामुळे या भागाला एक अनन्य साधारण भौगोलिक स्थान प्राप्त झाले होते. सह्याद्रीच्या पूर्वेस कमी पावसाचा प्रदेश लागतो. सह्याद्रीच्या कुशीत उगम पावून गोदावरी, भीमा, निरा, कृष्णा, वारणा, घटप्रभा अशा अनेक लहान-मोठ्या नद्या पूर्वेकडे वाहतात. या नद्यांची खोरी सुपीक असली तरी पूर्व-पश्चिम पसरलेल्या अनेक डोंगर रांगांनी हा प्रदेश उंच

सखल बनला आहे. उदा.-चांदोर, डोंगर रांग, महादेव डोंगर रांग अशाअनेक डोंगर रांगांनी या प्रदेशाचे अनेक छोटे छोटे भौगोलिक प्रदेश बनविलेले आहेत.

## महाराष्ट्राची नैसर्गिक जडण घडण आणि मराठ्यांचा इतिहास -

मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करताना सह्यादी, कोकणची किचकट खडकाळ किनारपट्टी, देशावसरची पठारे, मान्सूनचा लहरीपणा, बेसाल्ट, काळी माती आणि एकंदरीतच निसर्गाची अवकृपा असलेला महाराष्ट्र आपल्या डोळ्यासमोर येतो.

तथापी चार हजार वर्षापूर्वी शेतकी संस्कृतीची सुरुवात गोदावरी खोऱ्यात झाली. आणि मानवी जीवनाला एक प्रकारचे स्थैर्य आले. महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशातून वाहणाऱ्या तापी, गोदावरी, भीमा आणि त्यांच्या काठची काळी माती ह्यावरुन ही शेतकी प्रधान संस्कृती बहरायला सुरुवात झाली. पण इ.स.१०००० च्या सुमारास महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला आणि या संस्कृतीची फार मोठ्या प्रमाणावर वाताहात झाली. ह्या लोकांना महाराष्ट्र सोडून द.भारतात जावे लागले. या उदाहरणावरुन असे म्हणता येईल की मनुष्य नैसर्गिक परिस्थितीचा पूर्ण गुलामही नाही पण त्याला त्यावर मात करणेही शक्य नाही. मानवाचा संपूर्ण इतिहास आपणाच हेच दाखवितो. मराठ्यांचा इतिहासही याला अपवाद नाही.

## महाराष्ट्रातील किल्ले -

सह्याद्रीच्या घाट माथ्यावर आणि त्याच्या थोडेसे पश्चिमेकडे महाराष्ट्रातील बरेचसे गिरीदुर्ग आहेत. ह्या किल्ल्यांची भूशास्त्रीय दृष्टीने वैशिष्ट्ये म्हणजे हे किल्ले बहुतांशी घट्ट बेसाल्टच्या थरावर वसले आहेत. ह्या घट्ट बेसाल्टमधील संधीमुळे त्याचे विदरण असे होते की, त्या थरातील खंड अगर स्तंभ जरी अलग होवून कोसळून बाहेर पडले तरी मूळ थरात एक प्रकारचा तीव्र उताराच्या भिंतीसारखा कडा निर्माण होतो. ह्या कड्यामुळे एक प्रकारची भिंत तयार होते. या कड्यावर मग तट, बुरुज वगैरे बांधून संरक्षण व्यवस्था मजबूत करणे शक्य झाले. परत घट्ट बेसाल्टमध्ये जलधारकता चांगली असल्यामुळे पठारी प्रदेशापासून उंचावर किल्ल्यावर पाणी चांगले मिळणे तितकेसे अवघड नव्हते. हा घट्ट बेसाल्ट बांधकामाला पण चांगला होता. तसेच पठारापासून उंच असल्याने सभोवतालच्या प्रदेशावर ताबा ठेवण्यास उपयुक्त असे हे सह्याद्रीवरील किल्ले मराठी राज्याला वरदानच ठरले. ह्या उलट जे किल्ले (पुरंधर, सिंहगड) सह्याद्रीच्या पूर्वेकडील पठारी प्रदेशात होते, त्यांची तुलनात्मकदृष्टया दुर्गमता कमी असल्याने ते किल्ले मराठ्यांना ताब्यात ठेवणे नेहमीच जड गेले. महाराष्ट्रातील सागरी किल्ले पण समुद्रात शिरलेल्या कठीण खडकांच्या सुळक्यांवरच बांधले आहेत.

थोडक्यात म्हणजे भूमीरचना, गिरीदुर्ग आणि सागरीदुर्ग यांना पोषक होती आणि त्याचा फायदा मराठ्यांना निश्चितच झाला.

**<u>महाराष्ट्राची भू-रचना आणि हवामान -</u>**

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण हे प्रदेश, उत्तर महाराष्ट्र, मध्यप्रदेश, म्हैसूर राज्यांपेक्षा निश्चितपणे मागास्लेले होते. ह्या भागात पडणारे वारंवारचे दुष्काळ, शेतीला उपयुक्त असलेल्या गाळाच्या जमिनीची कमतरता, वर्षातील पाच-सहा महीने कोरड्या पडणाऱ्या नद्या, उपयुक्त खनिजांची कमतरता, ह्या सर्व कारणांनी हा भाग दुर्लक्षिला गेला आणि परकीयांच्या दृष्टीने ही तितकासा महत्वाचा राहिला नाही. या मागासलेल्या भागात मराठी माणसाची एक वेगळीच प्रतिमा तयार झाली. हे लोक किरकोळ शरीर यष्टीचे, साधे व काटक होते. [९]

महाराष्ट्राच्या पठारी भागावर चांगले गवत असल्यामुळे भीमथडी तट्टांची पैदास पण चांगली झाली. इ.स.१६३० मध्ये पडलेल्या दीर्घ अवर्षणामुळे महाराष्ट्रातील मुसलमानी शासकीय व्यवस्था खिळखिळी झाली व या व्यवस्थेविरुध्द असंतोष धुमसत होता. ह्या कठीण परिस्थितीचा फायदा शिवाजीराजांना मिळाला. ह्यामुळे गनिमी युध्दाला पोषक असलेल्या या भूनीत मराठी राज्याची स्थापना झाली. ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशाचा मागसलेपणा मराठ्यांना राज्य स्थापन करताना उपयोगी झाला, त्याचप्रमाणे कोकणची भूमीपण स्वराज्य टिकविण्यास उपयुक्त ठरली. कोकणच्या पूर्व-पश्चिम वाहणाऱ्या नद्या, या नद्यांच्या मुखाजवळ तयार होणारे वाळूचे पट्टे, समुद्रापर्यंत येणारे डोंगरांचे सुळके, जांभ्याची शेतीला निरुपयोगी असलेली पठारे, चार महिने कोसळणारा पाऊस आणि उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची चणचण, डोंगराळ भूरचना आणि समुद्रकाठचा दलदलीचा प्रदेश हे सर्व गुणधर्म कोकणच्या भूमीत सार्वभौम असे एकसंघ राज्य होण्याच्या विरुध्द गेले. कोकणच्या किनाऱ्यावर पोर्तुगीजांनी आणि ब्रिटीशांनी काही ठिकाणी सत्ता स्थापन केली, पण त्यांना सबंध कोकणावर सत्ता स्थापता आली नाही. कारण कोकणची दुर्गमता. ह्यामुळेच मराठी राज्य अबाधित राहिले.

ह्याउलट मराठी राज्याचा विस्तार ज्यावेळेस होऊ लागला, त्यावेळेस त्यांना उत्तर भारतातील वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेणे अवघड झाले. गंगा-यमुनेच्या खोऱ्यातील दलदलीची पूरमैदाने, विषम हवानान, वारंवार पात्र बदलणाऱ्या नद्या, ह्यामुळे मराठे आपला पाय त्या भागात चांगल्याप्रकारे रोवू शकले नाहीत.

मराठी राज्याचा उदय, विस्तार आणि ऱ्हास यावर भौगोलिक परिस्थितीचा निश्चितपणे परिणाम झाला, पण केवळ ह्यामुळेच हे सर्व घडले असे म्हणणेही चुकीचे ठरेल.

मराठ्यांच्या उदयास्ताच्या इतिहासाला कारणीभूत ठरलेल्या अनेक घटकांपैकी (राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वगैरे) एक म्हणजे भौगोलिक परिस्थिती. तिचा विचार अपरिहार्य ठरत असल्याने वरीलप्रमाणे तिचे थोडक्यात पण समग्र विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

१-ii) **शिवपूर्वकालीन राजकीय इतिहास -**

वरील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम राजकारणावर होणे स्वाभाविक होते. विविध प्रकारची भौगोलिक परिस्थिती, नद्या, किल्ले, जंगले, पर्वतराजी, दळणवळणांच्या साधनांचा अभाव यामुळे प्रत्येक प्रांत एकाकी राजकीय

घटक बनले होते. राजकीय ऐक्याचा अभाव असल्याने एकछत्री अंमल निर्माण होणे कठीण होते. प्राचीनकाळी चंद्रगुप्त मार्य (३२४-३०० इ.स.पूर्व), सम्राट अशोक (२७२-२३६ इ.स.पू.), हर्षवर्धन (६००-६४७ इ.स.पू.) यांनी एकछत्री अंमल प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता. मध्ययुगात अकबराने (इ.स.१५५६-१६०५) तसा प्रयत्न केला होता. मात्र औरंगजेबानंतर मुघत सत्तेचा झपाट्याने ऱ्हास झाला तर मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार झाला.

इ.स.सतराव्या शतकात मराठ्यांच्या सत्तेचा जो उदय झाला त्याबद्दल अनेकांनी आतापर्यंत चर्चा केली असून विविध मते प्रतिपादीली आहेत. त्यावर उलट-सुलट चर्चाही झाली आहे. येथे त्या चर्चेत शिरण्याचे कारण नाही. मात्र मराठ्यांच्या सत्तेचा जो उदय झाला त्याला येथील भौगोलिक वातावरण येथील सांस्कृतिक वातावरण, संतांची कामगिरी, भाषा आणि साहित्य, येथील शिवपूर्वकाळातील राजकीय परिस्थिती इ. सर्वच घटक कमी-अधिक प्रमाणात कारणीभूत ठरले, असे म्हणता येईल.

एकंदरीत परिस्थिती अनुकूल होती. आवश्यकता होती फक्त खंबीर नेतृत्वाची आणि सर्व मराठ्यांना (महाराष्ट्रीय माणसांना) एका सुत्रात गोवणाऱ्या कुशल संघटकाची. छ.शिवाजी महाराजांच्या रुपाने असे नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. त्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीशी टक्कर देऊन महाराष्ट्रातील विखुरलेल्या मराठी समाज एक केला आणि येथे हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. पुढे त्याच स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. परंतु ते पाहण्या अगोदर अगदी आवश्यक तेवढा भूतकाळ समजून घेणे आवश्यक असल्याने त्याची मांडणी अगोदर करु.

**<u>विजयनगरचे हिंदू साम्राज्य आणि बहामनी संघर्ष –</u>**

महंमद तघ्लकाच्या कारकिर्दीत (१३२५-१३५१) त्याच्या साम्राज्याचे विघटन होऊन दक्षिणेत मुसलमानी राज्य व विजयनगरचे बलाढ्य व ऐश्वर्य संपन्न हिंदू राज्य उदयास आले. परंतु बहामहनी राज्याशी सतत झगडे होत राहिले. अखेर अशाच एका झगड्यात विजयनगरचा दारुण पराभव होऊन पुढे अल्पावधीतच ते राज्य धुळीला मिळाले.

तेराव्या शतकाच्या अखेरीस अल्लाऊद्दीन खिलजीने नर्मदा ओलांडून दक्षिणेत प्रवेश केला आणि त्याने देवगिरीच्या यादवांचे राज्य जिंकून घेतले. त्यानंतर त्याचा सरदार मलिक काफूर याने इ.स. १३०९ ते १३२६ या काळात वारगळ, द्वारसमुद्र ही राज्ये जिंकून घेतली. अशारितीने चौदाव्या शतकाच्या आरंभीच दक्षिण भारतात मुसलमानी सत्ता नांदू लागल्या. हिंदू धर्म आणि हिंदूंची श्रध्दास्थाने यांना कोणीही त्राता उरला नाही.

अशा आणिबाणीच्या परिस्थितीत दक्षिणेत विजयनगर येथे हिंदू राज्याची स्थापना झाली. ही स्थापना इ.स. १३३६ मध्ये हरिहर आणि बुक्क या उभय बंधूंनी शृंगेरीच्या मठाचे शंकराचार्य श्री माधवाचार्य उर्फ विद्यारण्य स्वामी यांच्या सल्ल्याने केली. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्याच सुमारास दुसरी एक राजवट म्हणजे बहामनी राजवट उदयास आली (१३४७) दिल्लीच्या सुलतानाऐवजी बहामनी सुलतानचा अंमल महाराष्ट्रावर सुरु झाला. विजयनगर आणि बहामनी यांचे संघर्ष सतत घडून येतच होते. २३-१-१५६५ च्या तालिकोटच्या लढाईत बहामनी राज्यातील वेगवेगळ्या शाह्यांनी एकत्र येवून विजयनगरचा धुव्वा उडविला. अशारितीने १३३६ ते १५६५ या सुमारे सव्वा दोनशे वर्षांच्या

काळात विजयनगरने हिंदू साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तथापी तालीकोटच्या पराभवाने त्यांचे ते स्वप्न धुळीस मिळाले.

**दक्षिणेतील मुघलांचे राजकारण –**

दक्षिणेतील बहामनी राज्य १५२६-२७ मध्ये नष्ट झाले. त्याचवेळेस उत्तरेत इब्राहीम लोदीचा पराभव करुन बाबराने मोगल बादशाहीची मुहूर्तमेढ रोवली. बाबरापासून औरंगजेबापर्यंत सर्व बादशहांनी सर्व हिंदुस्थान स्वतःच्या वर्चस्वाखाली आणण्याचे स्वप्न पाहिले. अकबराच्या कारकिर्दीत मुघलांचा दक्षिणेच्या राजकारणाशी संबंध आला. त्याच्याच कारकिर्दीत काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मीरपासून भीमानदीपर्यंतचा हिंदुस्थान जिंकला गेला. त्याने खानदेश, वऱ्हाड आणि अहमदनगर हेही प्रदेश जिंकले. हे प्रदेश आता मुघली सुभे म्हणून ओळखले जावू लागले व त्यांच्यावर मुघली सुभेदार नेमले जावू लागले. शहाजहानने निजामशाहीची अखेर करताच गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने व विजापूरच्या आदिलशहाने त्याचे मांडलिकत्व स्विकारले. शहाजहान उत्तरेत निघून गेला व त्याचा पुत्र औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार बनला. त्याच्या अंमलाखाली दक्षिणेतील खानदेश, वऱ्हाड, तेलांगण व दौलताबाद असे चार प्रांत मोडत होते.

**दक्षिणेतील आणखी दोन सत्ता –**

प.किनाऱ्यावर आपले सागरी वर्चस्व निर्माण करणाऱ्या सिद्दी व पोर्तुगीज या दक्षिणेतील आणखी दोन सत्ता. मराठ्यांच्या शत्रुंच्या यादीत या दोन शत्रूंची भर पडली होती. मोगल व दक्षिणेतील सुलतान मराठ्यांना भूमीवर अजिंक्य ठरले होते, तर सिद्दी व पोर्तुगीज त्यांना सागरावर अजिंक्य ठरले होते.

सिद्दी ही मूळची आफ्रिकेतील ॲबसेनिया या देशातील इस्लामी जमात होय. मुंबईच्या दक्षिणेला ४५ मैलावर असलेल्या समुद्रातील जंजीरा किल्ला व राजापूरच्या खाडीवर असणारी दंडराजपुरी ही ठिकाणे हे त्यांचे पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश होते. प.किनाऱ्यावरील ही सत्ता मराठ्यांच्या स्वातंत्र्याच्या मार्गात उभी राहिलेली अडचण होती.

दुसरी सत्ता ही पोर्तुगीजांची. ही व्यापारी आणि राजकीय अशा दुहेरी स्वरुपाची होती. १५१० मध्येच आदिलशहाकडून त्यांनी गोवा जिंकून घेतला होता. पुढे सन १५४३ मध्ये खुद्द आदिलशहानेच त्यांना साष्टी व बारदेश हे गोव्यालगतचे प्रांत बक्षिस म्हणून दिले. गुजराथच्या सुलतानाकडून त्यांना वसई प्रांत मिळाला. १५३६ मध्ये त्यांनी तेथे वसईचा किल्ला बांधला.

अशाप्रकारे सोळाव्या शतकाच्या शेवटी पोर्तुगीजांच्या राज्यात दिव-दमण, मुंबई, वसई, चौल, गोवा, सास्टी हे महाराष्ट्राला जवळ असणारे प्रदेश मोडत असत. पोर्तुगीज हे केवळ व्यापारावर समाधानी नसल्याने त्यांनी राज्यवृध्दी व धर्मप्रसार हे उद्योग केले. स्वाभाविकच आदिलशाही, मोगल व मराठे यांच्याशी त्यांचे राजकीय व लष्करी संघर्ष घडून आले.

**थोडक्यात –**

इ.स.१६३६ पर्यंत म्हणजे निजामशही बुडेपर्यंत महाराष्ट्राचे निरनिराळे भू-भाग दक्षिणेतील वर उल्लेखिलेल्या शाह्या आणि दिल्ली चे मोगल यांच्या अधिपत्याखाली विखुरलेल्या होत्या. त्या काळात महाराष्ट्राचा बराचसा भाग आदिलशाही आणि मोंगल यांच्यात वाटलेला होता. मुंबई बेट इंग्रजांचे, गोवा पोर्तुगिजांचा तर जंजीरा हबशांचा होता.

प्रा.सदाशिव आठवले यांच्या शब्दात सांगायचे तर, ''राजकीय सत्तेच्या दृष्टीने शिवाजीच्या उदयापूर्वी हा महाराष्ट्र अनेकांचा होता. तो नव्हता फक्त काय तो मराठ्यांचाच.''[११] आतापर्यंत शिवजन्मापूर्वीच्या इतिहासाचे जे धावते वर्णन केले आहे त्यावरुन प्रा.आठवले यांचे मत मान्य करण्यास कोणाचीही हरकत असू नये.

१-iii) **साधनांची व्याप्ती –**

मराठ्यांच्या उदय-विस्तारावर अनेक विद्वान संशोधकांनी विपुल लेखन केले आहे. ग्रँटडफ, बाळकृष्ण, सर यदुनाथ सरकार, सरदेसाई, डॉ.हाताळकर, डॉ.मुद्दाचारी, रघुवीर सिंग, डॉ.वि.गो.दिघे, डॉ.एच.एन.सिन्हा, इत्यादींनी इंग्रजीत तर मराठीत राजवाडे, रानडे, शेजवलकर, सरदेसाई, बेंद्रे, खरे, पगडी, पोतदार यांनी अनेक साधने प्रकाशात आणून प्रसंगी त्यांचे लेखन केले आहे. तथापी वरीलपैकी बहुतेकांनी आपल्या लेखनाचे दोन भाग केले. शिवकाल आणि पेशवेकाल. पेशवेकाळात मराठ्यांच्या साम्राज्यास गती आली असे सर्वसाधारण चित्र बहुतेकांनी रेखाटले.

येथे प्रथमच शिवकाल ते बाजीराव असा एकत्रित काळ घेऊन मराठ्यांच्या प्रदेश विस्ताराचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण प्रस्तुत काळात एक ऐतिहासिक सलगता आहे ती शोधण्याचाही हा एक नम्र प्रयत्न आहे. तो करण्यासाठी जी साधने वापरली त्यांचा थोडक्यात गोषवारा असा.

**अप्रकाशित साहित्य –**

पुणे येथील पेशवा दफ्तरातील अप्रकाशित पत्रे. याविषयाच्या अनुषंगाने पुणे येथील पेशवा दफ्तर आणि भारत इतिहास संशोधक मंडळ येथे उपलब्ध असलेल्या काही अप्रकाशित साधनांचा मागोवा घेतल्यानंतर प्रस्तुत विद्यार्थ्याला पेशवा दफ्तरामध्ये अप्रकाशित अशी काही चार-पाच पत्रे मिळाली. ती चार-पाच पत्रे विशेषत: पेशवा दफ्तरामध्ये असलेल्या संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे यातून घेतलेली आहे. पैकी एक पत्र ताराबाई कालीन असून ते दफ्तर क्रं.१, पुडके क्र.१, पत्र क्र.७ हे असून ते ताराबाईचे एका फुटीराला असलेले अभयपत्र आहे. साम्राज्य विस्ताराच्या काळात जशी जीवावर उदार होऊन साम्राज्य रक्षण आणि विस्तारार्थ त्याग करणारी माणसे होती तशीच शत्रूलाही जाऊन मिळणारी होती. अशाच एका शत्रूकडे गेलेल्या माणसाला ताराबाईने अभय देऊन परत बोलाविले. त्यावरुन तिच्या स्वभावावर चांगला प्रकाश टाकता येतो. याच कागदपत्रातून आणखी तीन-चार पत्रे प्रस्तुत विद्यार्थ्याला मिळाली असून ती बाजीराव कालीन असून दफ्तर क्र.१ आणि ३ मध्ये पुडकी क्र. अनुक्रमे २, ३, ४ मध्ये मिळाली असून त्यांचे पत्र क्र. अनुक्रमे १५१६, ३६६ आणि ६५० असे आहेत. मराठ्यांचा प्रदेश विस्तार होत असताना एकमेकाला एकमेकांकडे बोलावणे, त्यासाठी देण्या-घेण्यांचे व्यवहार इ. गोष्टींवर उपरोक्त पत्रांवरुन प्रकाश पडतो.

वरील तीन पत्रांचा उपयोग प्रकरण नं.३ आणि ४ मध्ये केलेला आहे तर पहिल्या पत्राचा उपयोग दुसऱ्या प्रकरणात करुन घेतला आहे.

या मूळ अप्रकाशित अस्सल पत्रांशिवाय संपूर्ण लघुशोध प्रबंधाचे लेखन करीत असताना पुढील प्रकाशित परंतु अस्सल साधने वापरण्यात आली आहेत. ती साधने म्हणजे करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने खंड १ आणि २ संपादक-मा.वि.गुजर. कापशीकर सेनापती घराण्याची कागदपत्रे - संपादक श.ह.वर्टीकर, ताराबाईकालीन कागदपत्रे - डॉ.अप्पासाहेब पवार, पुरंदरे दफ्तर - संपादक कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, तसेच राजवाडे खंड २, ३, ५, ६, ८ आणि १५ इ. तसेच रियासतकार सरदेसाई संपादित पेशवे दफ्तरातून निवडलेल्या कागदांचे खंड क्र.७, १०, १२, १३, १४, १५, १७, २०, ३०, ४०, ४४ आणि ४५ इतक्या खंडांचा उपयोग केला. त्याचप्रमाणे सभासद बखर संपादक स.रा.गाडगीळ, छत्रपती राजाराम महाराजांची बखर - संपादक सौ.प्रमोदिनी जुवेकर, नागपूरकर भोसल्यांची बखर - संपादक या.मा.काळे, मल्हार रामराव चिटणीस विरचीत थोरल्या शाहू महाराजांचे चरित्र इ. बखर वाङ्मयाचाही उपयोग केला आहे.

त्याचप्रमाणे या विषयाच्या अनुषंगाने महत्वाची अशी फारसी आणि पोर्तुगीज मराठी भाषांतरे उपयोगात आणलेली आहेत. फारसी भाषांतरे सर्वच सेतुमाधवराव पगडींनी संपादित केली आहेत. तर पोर्तुगीज भाषांतरे स.शं.देसाई आणि डॉ.पी.एस.पिसुर्लेकर यांची विशेषत: उपयोगात आणलेली आहेत.

**<u>अनुवादीत फारसी साधने -</u>**

मासीरे आलमगिरी - लेखक साकी मुस्तैदखान, अनुवाद - मराठे व औरंगजेब

उर्दू फारसी साधने - अनुवाद मराठे आणि निजाम

खाफीखान - अनुवाद मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द

तारीखे दिलकुशा - भिमसेन सक्सेना, अनुवाद - मोगल आणि मराठे

याशिवाय मोगल दरबारची बातमीपत्रे खंड १ आणि खंड २ यांचाही उपयोग केला आहे.

अनुवादीत पोर्तुगीज साधनांमध्ये स.शं.देसाईंची शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहासाची साधने पोर्तुगीज मराठे संबंध, पोर्तुगीज दफ्तर खंड २ आणि खंड ३, करवीर छत्रपती आणि पोर्तुगीज इ. ग्रंथांचा उपयोग केला आहे. तर डॉ.पी.एस.पिसुर्लेकरांच्या पोर्तुगीज - मराठे संबंध या ग्रंथाचाही उपयोग केला आहे.

याशिवाय भारतीय इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांच्या त्रैमासिकाचे काही अंक तर भारतीय इतिहास आणि संस्कृती यांच्या त्रैमासिकाचे काही अंक उपयोगात आणले आहेत. तसेच नवभारतच्या काही अंकांचा वापर केला आहे. याशिवाय महत्वाचे इंग्रजी आणि मराठी ग्रंथ उपयोगात आणले आहेत त्या सर्वांची सविस्तर संदर्भ सूची लघुशोध प्रबंधाच्या अखेरीस जोडली आहे.

# संदर्भ टीपा

१) रा.श्री.मोरवंचीकर, प्राचीन भारत, नागपूर, १९९०, पृ. ५-७

२) म.गो.रानडे, मराठी सत्तेचा उदय (अनुवाद) वि.गो.विजापुरे, मुंबई, १९९५, पृ.३०

३) Walter Hamiltan, Description of Hindustan, Delhi,1971, p.p.1-4

४) रा.श्री.मोरवंचीकर, उपरोक्त, पृ. १२

५) J.Sarkar, Shivaji and His Times, Calcutta, 1919, (1st edition) p.p.10

६) म.गो.रानडे, उपरोक्त, पृ. ३०

७) रा.ग.गडकरी, वाग्वैजयंती, (संपादक) रा.शं.वाळींबे, पुणे, १९६५, (दु.आ.) पृ. १६६-७

८) गो.नि.दांडेकर, महाराष्ट्र दर्शन, मुंबई, १९६९, (दु.आ.) पृ.७७

९) म.गो.रानडे, उपरोक्त, पृ. ३०

१०) य.न.केळकर, वसईची मोहीम, पुणे, १९३७, पृ. ९

डॉ.पिसुर्लेकर म्हणतात, सन १५३४ साली पोर्तुगीजांनी वसई प्रांत गुजराथच्या सुलतानाकडून मिळविला. पुढच्या वर्षी त्यांनी दीवचा किल्ला बांधण्यास सुरुवात केली. पण डॉ.पिसुर्लेकर वसई किल्ल्याच्या बांधकामाचा उल्लेख करत नाहीत.

पहा - पा.स.पिसुर्लेकर, पोर्तुगीज - मराठे संबंध, पुणे, १९६७, पृ. २

११) सदाशिव आठवले, शिवाजी आणि शिव युग, कोल्हापूर, १९७१, पृ. २९